सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३३५ | शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १,५६,५००
२२ सोने ९१.६०% : ₹ १,४५,५००
१८ सोने ७५.००% : ₹ १,१९,५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,४४०/-
भाव प्रती १० ग्राम

# माहेरच्या अंगणात फुलणार ‘पारिजात’!

## अमळनेरच्या लेकींचा आगळावेगळा कौतुक सोहळा;

## श्री मंगळग्रह मंदिरात रंगणार तीन दिवस आठवणी अन् सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माहेरच्या अंगणातील बालपणीच्या आठवणींना उजाळा देत, सासर-माहेर दोन्ही कुटुंबांना आपल्या कर्तृत्वाने आणि मायेने समृद्ध करणाऱ्या अमळनेरच्या लेकींचा आगळावेगळा कौतुक सोहळा ‘माहेरचा पारिजात’ या उपक्रमातून आयोजित करण्यात आला आहे. अमळनेर महिला मंच ट्रस्टच्या वतीने हा विशेष स्नेहमेळा शनिवार, दि. २९ ऑगस्ट ते सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत येथील श्री मंगळग्रह मंदिरात रंगणार आहे. त्यासाठी मंगळग्रह सेवा संस्थेचे विशेष सहकार्य लाभले आहे.

पारिजातकाच्या फुलांचा सडा जसा अवघे अंगण सुगंधित करतो, त्याचप्रमाणे माहेरच्या लेकी आपल्या अस्तित्वाने, कर्तृत्वाने आणि मायेने सासर-माहेर दोन्ही घरे उजळून टाकतात. याच भावनेतून ‘माहेरचा पारिजात’ या उपक्रमाची संकल्पना साकारण्यात आली आहे. माहेरच्या अंगणात पुन्हा एकदा बालपण अनुभवता यावे, जुन्या आठवणींना उजाळा मिळावा आणि मैत्रिणींसोबत मनमोकळ्या गप्पांची मैफल रंगावी, हा या सोहळ्यामागील प्रमुख उद्देश आहे.

या स्नेहमेळ्यात भाषण, कविता, गाणी, नृत्य, विनोद, पारंपरिक खेळ, उखाणे, मंगळागौरीचे खेळ यांसह विविध मनोरंजक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री मंगळग्रह मंदिर परिसरातील हिरवाईने नटलेल्या प्रसन्न वातावरणात हा सोहळा आनंद, उत्साह आणि भावनिक आठवणींनी रंगणार आहे.

या उपक्रमासाठी २,१०० रुपये नोंदणी शुल्क ठेवण्यात आले असून, सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी लवकरात लवकर नोंदणी करून आपली जागा निश्चित करण्याचे आवाहनही आयोजकांनी केले आहे. या उपक्रमासाठी सहभागींची संख्या मर्यादित ठेवण्यात आली आहे.

नोंदणी शुल्क प्रा. सौ.शीलाताई पाटील (९४२२४ ०९९५९) यांच्याकडे पाठवून पेमेंटचा स्क्रीनशॉट संबंधित नोंदणी प्रतिनिधीकडे पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्षा सौ. कांचनताई शहा, उपाध्यक्षा सौ. तिलोत्तमाताई पाटील व सौ. सरोजताई भंडारकर, सचिव सौ. वसुंधराताई लांडगे, खजिनदार प्रा. सौ. शीलाताई पाटील यांच्यासह महिला मंचच्या कार्यकारी मंडळातील सदस्या आणि मंगळग्रह सेवा संस्थेचे सर्व विश्वस्त व सेवेकरी परिश्रम घेत आहेत. “माहेरच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि माहेरच्या लेकींचा सन्मान अनुभवण्यासाठी सर्व माहेरवाशिणींनी आवर्जून सहभागी व्हावे,” असे आवाहन अमळनेर महिला मंच ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.




अमळनेर : नाशिक येथील उद्योग व सेवा विभागाच्या सह-आयुक्त सौ. वृषालीताई धनंजय आगाशे (आय.ए.एस.) यांनी कुटुंबीयांसह गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेऊन पूजा-अभिषेक केला. यावेळी त्यांचा सत्कार करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर. शेजारी ‘लक्ष्मीनारायण मशिनरी’चे संचालक श्री. सोनी, जळगाव जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक उद्योग अधिकारी एस. टी. लासूरकर व मंगल सेवेकरी विनोद अग्रवाल.

(छायाचित्र : नितेश बारी)

# ‘रवि ज्वेलर्स’तर्फे महिला सन्मान, समानता व रक्षाबंधनानिमित्त कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ‘रवि ज्वेलर्स’तर्फे महिला सन्मान, महिला समानता आणि रक्षाबंधनाच्या पवित्र नात्याचे महत्त्व अधोरेखित करणारा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमास तनिष्का ग्रुपच्या महिला सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सुरूवातीला उपस्थित मान्यवर व महिलांचे स्वागत करण्यात आले. महिला सन्मान व समानता या विषयावर रवि वर्मा आणि ॲड. तिलोत्तमा पाटील यांनी मार्गदर्शन केले.

महिलांना समान संधी, सन्मान तसेच निर्णयप्रक्रियेत सहभाग मिळण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. रक्षाबंधनाचे महत्त्व आणि भाऊ-बहिणीचे प्रेम, जिव्हाळ्याच्या नात्याविषयी सौ. उषाताई देवरे यांनी मार्गदर्शन केले. ‘रवि ज्वेलर्स’च्या विविध योजना व वैशिष्ट्यांची माहिती निखिल वर्मा यांनी दिली. यावेळी विविध मनोरंजक खेळ, प्रश्नोत्तरांचे सत्र आणि संवादात्मक उपक्रम घेण्यात आले. त्यामुळे कार्यक्रमाला आनंदी व उत्साही वातावरण लाभले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. तिलोत्तमा पाटील होत्या. यावेळी सौ. उषाताई देवरे, सौ. हेमाताई भामरे, सौ. करुणाताई सोनार, सौ. कल्पनाताई पाटील, डॉ. विनीताताई चव्हाण आदी उपस्थित होते. ‘रवि ज्वेलर्स’तर्फे रवि वर्मा, निखिल वर्मा, सौ. सुलोचनाताई वर्मा, सौ. गुंजनताई वर्मा, सौ. आराध्याताई वर्मा आदी उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थित सर्व महिलांना ‘रवि ज्वेलर्स’तर्फे भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमातून महिलांप्रती आदर, कृतज्ञता आणि आपुलकीची भावना व्यक्त करण्यात आली. महिला सन्मान, समानता तसेच रक्षाबंधनातील प्रेम, विश्वास आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली.



अमळनेर : येथील ‘रवि ज्वेलर्स’तर्फे नुकताच महिला सन्मान, महिला समानता आणि रक्षाबंधनाच्या पवित्र नात्याचे महत्त्व अधोरेखित करणारा विशेष कार्यक्रम झाला. याप्रसंगी महिलांना रक्षाबंधनाचे महत्त्व आणि भाऊ-बहिणीचे प्रेम, जिव्हाळ्याच्या नात्याविषयी मार्गदर्शन करीत विविध योजना व वैशिष्ट्यांची माहिती देत त्यांचा सन्मान करताना संचालक रवी वर्मा, निखिल वर्मा, सौ. सुलोचनाताई वर्मा. शेजारी ॲड. तिलोत्तमा पाटील व सौ. उषाताई देवरे आदी.

# जिल्ह्यातील महापौर, नगराध्यक्ष व नगरसेवकांची विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती

## जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्याकडून आदेश जारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे राज्यात विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे सुधारित निकष व जबाबदाऱ्या निश्चितीचे आदेश जारी केले असून, त्या-त्या जिल्ह्यातील निवडणुकांमधून निवडून आलेले लोकसभा, राज्यसभा, विधान परिषद, विधानसभा सदस्य यांसह महापौर, नगराध्यक्ष व नगरसेवक यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीचे आदेश देण्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केले आहेत. त्या अनुषंगाने जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी जिल्ह्यातील लोकसभा, राज्यसभा, विधान परिषद, विधानसभा सदस्य यांसह महापौर, नगराध्यक्ष व नगरसेवक यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती प्रदान केली आहे. यासंदर्भातील आदेश त्यांनी दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी दिला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे, की शासन निर्णयाच्या अनुषंगाने ३ फेब्रुवारी २०२५ मधील मुद्दा क्र. ५.१ व ५.२ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये जळगाव जिल्ह्यातील कार्यरत लोकसभा, राज्यसभा, विधान परिषद, विधानसभा सदस्य यांसह महापौर, नगराध्यक्ष व नगरसेवक यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे. यामध्ये कोणतीही पदसिद्ध नियुक्ती ५ वर्षांकरिता अथवा पुढील आदेशापर्यंत अथवा सदर व्यक्ती त्या पदावर असेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील. जिल्हाधिकाऱ्यांना विशेष कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील. ज्या पदामुळे विशेष कार्यकारी अधिकारी पदावर पदसिद्ध नियुक्ती करण्यात आली होती, ते पद संपुष्टात आल्यास पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती आपोआप रद्द होईल.

या आदेशात विशेष कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्यांसह सर्वसाधारण सूचनाही जिल्हाधिकारी घुगे यांनी आदेशात नमूद केल्या आहेत.



आजचे अभीष्टचिंतन



**प.पू. जनार्दन हरिजी महाराज**
महामंडलेश्वर स्वामी, फैजपूर



**श्री. प्रकाश पाटील**
मुख्याध्यापक, अमळनेर



**वैद्यराज हेमंत चुटे**
अमळनेर



**श्री. अंबादास देवरे**
जेल पोलीस, जळगाव

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# महाराष्ट्राच्या मुंढेंसोबतच हैदराबादमध्ये गायकवाडांचा धडाका

## भेसळयुक्त खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांच्याविरोधात करताहेत कठोर कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



महाराष्ट्रात सध्या तुकाराम मुंढे यांच्या धडाकेबाज कारवाईची चर्चा सुरू असतानाच तेलंगणात मराठमोळे आयपीएस अधिकारी वैभव गायकवाड यांच्या कारवाईचीही जोरदार चर्चा रंगली आहे. हैद्राबादसह तेलंगणात भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांविरोधात ते कठोर कारवाई करीत आहेत. हे त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मोहिमेतून दिसून येत आहे. मूळचे अहिल्यानगरचे असलेले वैभव गायकवाड सध्या हैद्राबादमध्ये टास्क फोर्सच्या डीसीपी पदावर कार्यरत आहेत.

हैद्राबादमध्ये डीसीपी गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील H-FAST (Hyderabad Food Adulteration Surveillance Team) पथकाने अन्नभेसळ करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई केली आहे. अवैधरीत्या भेसळयुक्त तुपाचे उत्पादन आणि व्यापार करणाऱ्या आस्थापनांवर छापे टाकत तब्बल ३६ टन भेसळयुक्त तूप जप्त केले आहे. यासोबतच तूप तयार करण्यासाठी वापरला जाणारा कच्चा माल आणि विविध रासायनिक पदार्थही त्यांच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. H-FAST ने मार्च २०२६ पासून हैद्राबादमध्ये अन्नभेसळीविरोधात व्यापक मोहीम सुरू केली आहे. विविध खाद्यपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्री केली जाणाऱ्या ठिकाणी छापे मारीत आहेत. तसेच सर्वत्र तपासण्या करीत आहेत. या पथकाने मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त साहित्य जप्त केले आहे.

मार्च २०२६ पासून आतापर्यंत अन्नभेसळीशी संबंधित २०८ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत, तर २३२ प्रकरणे Food Safety Officer कडे सोपविण्यात आली आहेत. याच काळात विविध खाद्यपदार्थांशी संबंधित मोठ्या प्रमाणावर तपासण्या आणि कारवाया करण्यात आल्या आहेत. या कारवायांमध्ये तब्बल दोन लाख ९२ हजार २९८ किलो, म्हणजेच सुमारे २९२ टन भेसळयुक्त साहित्य जप्त करण्यात आले आहे.

जप्त करण्यात आलेल्या साहित्यामध्ये मसाले, तूप, दुग्धजन्य पदार्थ, मांसजन्य पदार्थ, चहा, फळे, बेकरी उत्पादनांसह आले व लसूण यांची पेस्ट यांचा समावेश आहे. खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करण्यासाठी हानिकारक रसायने, पाल्म ऑईल, वनस्पती तूप, स्टार्च तसेच अन्य अपायकारक पदार्थांचा वापर केला जात असल्याचे तपासणीत आढळून आले आहे. अन्नभेसळीविरोधातील ही मोहीम केवळ छापे आणि जप्तीपुरती मर्यादित नाही. सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण, भेसळीचे संपूर्ण नेटवर्क उघड करणे आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करणे हा देखील त्यामागील उद्देश आहे.

पान २ वर

### आयपीएस वैभव गायकवाड यांचे अमळनेरशी अतूट नाते

***तेलंगणातील मराठमोळे आयपीएस अधिकारी वैभव गायकवाड हे मूळचे पिंपळगाव माळवी (जि. अहिल्यानगर) येथील रहिवासी आहेत. त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केलेली आहे. ते अमळनेरचे जावई आहेत. त्यामुळे त्यांचे अमळनेरशी अतूट नाते आहे. श्री. आत्माराम चौधरी सर यांचे ते जावई आहेत. त्यांच्या धर्मपत्नी सौ. ऋचाताई गायकवाड या अमळनेरमधील द्रौ. रा. कन्या शाळेच्या विद्यार्थिनी आहेत. त्या सुद्धा बी.ई. (कॉम्प्युटर सायन्स) आहेत. सौ. ऋचाताई विद्यार्थीदशेपासूनच चित्रकलेत अतिशय निपुण आहेत. चित्रकलेत त्यांनी विविध पुरस्कार व बक्षिसे मिळविलेली आहेत.***

> **गेल्या दोन वर्षांपूर्वी वैभव गायकवाड यांच्या मातोश्रींना अन्नातून विषबाधा झाल्याने त्यांचे निधन झाले होते. तेव्हापासूनच श्री. गायकवाड यांनी खाद्यपदार्थांत भेसळ करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा विडा उचललेला आहे. सर्वसामान्य जनतेचे आरोग्य सुरक्षित राहिले पाहिजे. त्यासाठी त्यांना खाण्याकरिता उत्तम दर्जाचे पदार्थ मिळावेत, ही यामागील प्रामाणिक भावना आहे. नुकतीच श्री. गायकवाड यांनी हैद्राबादमधील डीसीपी स्पेशल टास्क फोर्सच्या माध्यमातून ३६ टन बनावट तूप, विविध रसायने मिश्रीत पनीर पकडले आहे. भेसळयुक्त २५ टन मसाले जप्त करून औद्योगिक रंग, टाल्कम पावडर व इतर घातक रसायनांचा पर्दाफाश केला आहे. त्यांच्या या धाडसी आणि कौतुकास्पद कार्याला सलाम!**
>
> **– आत्माराम चौधरी,**
> **शिक्षक / सामाजिक कार्यकर्ते, अमळनेर.**

## संपादकीय

### पदपथ हरवलेली महानगरे

सध्या पावसाळा सुरू आहे. पावसाळ्यातील वाढत्या समस्या या किती जीवघेण्या होऊ शकतात. हे रस्त्यांवरच्या खड्ड्यांवरून स्पष्ट होते. खड्ड्यांची समस्या संपूर्ण देशभर समान पद्धतीने पाहायला मिळते. विशेष म्हणजे महानगरांमधील खड्डे दर पावसाळ्यात अक्षरशः शेकडो बळी घेतात. परंतु यातील दुर्लक्षित झालेला आणि असे बळी जाण्यामागचे महत्त्वाचे कारण असलेला मुद्दा म्हणजे शहरांमधील पदपथ आहेत. महानगरांमधील वाहनांची प्रचंड संख्या, अपुरे रस्ते आणि पदपथांवर ठाण मांडून बसलेले अतिक्रमण हीदेखील पावसाळ्यामध्ये बळी जाण्याचे कारण ठरते. कारण जे पदपथ पादचाऱ्यांना चालण्यासाठी बनविले जातात. ते विक्रेते किंवा इतर अतिक्रमणांनी व्यापलेले आहे. लोकांना चालण्याकरिता पदपथ उपलब्ध होत नाहीत. त्यांना नाईलाजाने रस्त्यांच्या गर्दीतून वाट काढत जावे लागते. मुळातच रस्त्यांवरची रहदारी प्रचंड वाढलेली असते आणि त्यातच रस्त्यावरून चालणाऱ्यांचेही बळी जातात. एका खासगी संस्थेच्या सर्वेक्षणाप्रमाणे महानगरांमधील रस्ते अपघातांमध्ये पादचाऱ्यांचे जवळपास २९ टक्के मृत्यू होतात. खड्डेशिवाय पदपथ नसल्याने रस्त्यावरून चालणाऱ्या सामान्य माणसाला आपला जीव मुठीत धरूनच वावरावे लागते किंवा कुठले वाहन कशा पद्धतीने येऊन धडकेल याचा काही नेम नसतो. विशेषतः गेल्या दोन वर्षांमध्ये पादचाऱ्यांचे बळी वाढलेले आहेत. सरकार महानगरांमधील गर्दीवर नियंत्रण आणू शकत नाही. वाहनांची संख्या कमी करू शकत नाही आणि पदपथही मोकळे ठेवू शकत नाही. कोणत्याही पद्धतीने महानगरांमधील ही समस्या सरकार कमी करू शकत नाही आणि याच हलगर्जी आणि बेफिकिरीमुळे शेकडो लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. आता तर सर्वोच्च न्यायालयाने महानगरांमधील पदपथ हा महानगरातील जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचे मत नोंदविले आहे. हा विषय प्रत्येक राज्याचा असल्याने महानगरांमध्ये योग्य त्या पद्धतीने पदपथांचे सीमांकन होणे म्हणजेच प्रत्येक रस्त्याला लागून पदपथ असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट मत नोंदविले आहे. केंद्र आणि राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या मताची किती प्राधान्याने दखल घेते.

आपण लोकशाहीवादी देशात राहतो. संविधानाला सर्वाधिक महत्त्व देतो. केंद्र सरकार, राज्य सरकार, महापालिका किंवा सगळ्या स्थानिक स्वराज्य संस्था या संविधानाच्या नियमाप्रमाणे चालतात, असे आपण म्हणत असतो. परंतु हे एकाअर्थी अर्धसत्य आहे. जर संविधानाचे नियम प्रामाणिकपणे अमलात आणले, तर कोणत्याच समस्या निर्माण होणार नाहीत. परंतु लोकशाही महत्त्वाची आहे, असे म्हणत असतानाही लोकांना स्वतंत्रपणे नागरीशास्त्राचा अभ्यास करावा लागतो. समाजात कसे वागावे, नियम कसे पाळावे याचेदेखील धडे द्यावे लागतात. तर कायदे बनविणारे संसद किंवा विधिमंडळ ही जी सभागृहे आहेत तेथेसुद्धा किती प्रचंड गोंधळ चालतो. हे सगळा देश पाहतो. लोकप्रतिनिधी स्वतःसाठी सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून घेतात. पण सामान्य माणसांसाठी आवश्यक असलेल्या सेवा-सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. ज्याप्रमाणे शहरच काय सगळीचकडचे रस्ते हे उत्तम दर्जाचे असले पाहिजेत. परंतु ज्या रस्त्यांवरून नेहमी मंत्र्या-संत्र्यांची ये-जा असते ते रस्ते तंदुरुस्त ठेवले जातात. परंतु सामान्य माणसाची ज्या रस्त्यांवरून रोज ये-जा होते त्या रस्त्यांकडे दुर्लक्ष केले जाते. महानगरातील रस्ते बांधताना पदपथ असणे हा त्या शहराच्या नियोजनाचा एक भाग ठरतो. नियमाप्रमाणे बऱ्याच ठिकाणी पदपथ बांधलेही जातात. परंतु हे पदपथ कधी पूर्ण मोकळे आढळत नाहीत. अनधिकृत फेरीवाले, काही राजकीय पक्षांची कार्यालये मुंबई ठाण्यात तर अनेक ठिकाणी याच पदपथांवर बसथांबेही उभारले जातात. म्हणजे नागरिकांना सुरक्षितपणे चालण्याकरिता पदपथांची आवश्यकता असताना सरकारकडून दुर्लक्ष होते. म्हणजेच लोकशाही व्यवस्थेने किंवा संविधानाने सरकारला ज्या जबाबदाऱ्या सांगितलेल्या आहेत त्यादेखील पार पाडल्या जात नाहीत. शेवटी न्यायालयांना इतक्या साध्या-साध्या गोष्टींमध्येही लक्ष घालावे लागते आणि पदपथ हे नागरी जीवनाचा किती अनिवार्य भाग आहे हे लक्षात आणून द्यावे लागत असेल, तर सरकार म्हणून किती बेजबाबदारपणा केला जातो हेच त्यातून स्पष्ट होते.

महाराष्ट्रातील जवळपास सगळ्या महानगरांमध्ये हीच परिस्थिती पाहायला मिळते. मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई या ठिकाणी तर पदपथांचा विषय काही ना काही निमित्ताने गाजत असतो. विशेषतः फेरीवाले किंवा भाजीपाला विक्रेत्यांनी हे पदपथ बळकावलेले असतात. खरेतर त्यांना हे पदपथ आंदण देण्याचे काम त्या-त्या ठिकाणच्या महापालिका करत असतात. जसे फेरीवाल्यांविषयी कोणतेही धोरण राबविले जात नाही. तसेच पदपथांबाबतही कुठलेही धोरण राबविले जात नाही. महानगरांना ज्या-ज्या कारणांमुळे बकालपणा येतो त्यात पदपथांचे अस्तित्व नसणे हेदेखील त्याचे कारण आहे. स्वाभाविकपणे वाट चुकलेले नियोजन म्हणजेच पदपथ हरवलेली महानगरे, असे त्याचे वर्णन करावे लागते. प्रचंड वेगाने ही महानगरे विकसित होत आहेत. विकसित म्हणजे काय तर नागरी सुविधांचा बट्ट्याबोळ पण टोलेजंग इमारती आणि वाढणारी लोकसंख्या, आधुनिक पद्धतीच्या इमारती बांधल्या आणि हॉटेल्स, दुकाने यांची संख्या वाढली किंवा भरमसाठ फी उकळणाऱ्या शिक्षण संस्था आल्या की विकास झाला, असे मानले जाते. परंतु प्रत्येक नागरिकाला ज्या मूलभूत गोष्टींची आवश्यकता आहे त्याची योग्य पद्धतीने पूर्तता होणे याला खरे विकास म्हटले पाहिजे. लोकसंख्येने फुगणारी आणि अनावश्यक गोष्टींनी ही महानगरे वाढत असल्याने त्यांना सूज आलेली महानगरे म्हटले जाते. अशा या भरकटलेल्या नियोजनातून सामान्य माणसाला रोजच्या जगण्याचे अनेक प्रश्न भेडसावत राहतात.

### हैद्राबादमध्ये श्री. गायकवाडांचा धडाका

पान १ वरून :

यापुढेही अन्नभेसळ करणाऱ्या व्यावसायिकांवर सातत्याने कारवाई सुरू ठेवण्याचा निर्धार H-FAST पथकाने केला आहे. दरम्यान, श्री. गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील यंत्रणेकडून अन्नभेसळीबरोबरच मादक द्रव्यांविरोधातही प्रभावी कारवाई करण्यात आली आहे. हैद्राबाद सिटी नार्कोटिक्स विंगने मागील आठ महिन्यांत मादक द्रव्यांविरोधातही मोठी मोहीम राबविली आहे. या कालावधीत ४०० पेक्षा अधिक गुन्हे त्यांनी दाखल केले आहेत. सदर मोहिमेंतर्गत २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे मादक पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. अन्नभेसळ आणि मादक द्रव्यांविरोधातील या कारवायांमुळे हैद्राबादमध्ये कायदा-सुव्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने कठोर पावले उचलली जात असल्याचे चित्र आहे. श्री. गायकवाड यांच्या धडाकेबाज कारवाईची संपूर्ण तेलंगणात विशेष चर्चा होत आहे.

# अमळनेरच्या वकील दाम्पत्याने केला रक्तदानासह अवयवदानाचा संकल्प

## ॲड. सारांश व ॲड. पूजा यांनी सामाजिक बांधिलकी जपत केली वैवाहिक जीवनाची सुरूवात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तरुण वकील आणि वक्ते ॲड. सारांश धनंजय सोनार यांनी ॲड. पूजा विजय सुरसुरे यांच्याशी सहजीवनाची रेशीमगाठ बांधत सामाजिक बांधिलकी जपत वैवाहिक जीवनाची सुरूवात केली आहे. आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरूवात केवळ आनंद आणि उत्सवाने न करता ती एका अर्थपूर्ण सामाजिक कृतीने व्हावी, या विचारातून त्यांनी आपल्या विवाहाचा आनंद समाजाला अर्पित केला आहे.

गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी ॲड. सारांश यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत नोंदणी पद्धतीने विवाहबद्ध झालेल्या या दाम्पत्याने विवाहाच्या निमित्ताने आधी 'रक्तदान' केले. तसेच भारत सरकारच्या NOTTOच्या अधिकृत प्रणालीवर अर्ज दाखल करत मृत्यूपश्चात अवयवदानाची इच्छा नोंदवत संकल्पही केला.

यासंदर्भात ॲड. सारांश सोनार आणि ॲड. पूजा सुरसुरे म्हणाले, "विवाह हा आमच्या दोघांच्या आयुष्यातील नव्या पर्वाची सुरूवात आहे. याची आठवण केवळ आमच्यापुरती मर्यादित न राहता ती समाजासाठीही अर्थपूर्ण ठरावी, अशी आमची इच्छा होती. विवाह हा केवळ दोन व्यक्तींच्या सहजीवनाची सुरूवात नसून, समाजाप्रती असलेली बांधिलकी व्यक्त करण्याचीही एक संधी आहे. त्यामुळे विवाहाच्या निमित्ताने प्रथम रक्तदान आणि त्यासोबतच अवयवदानाचा संकल्प करण्याचा निर्णय घेतला. विवाहानिमित्ताने अवयवदानाचे महत्त्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवता यावे, अशी आमची इच्छा आहे. मृत्यूनंतर अवयवदान व रक्तदानाच्या माध्यमातून इतरांना नवजीवनाची संधी मिळू शकते. त्यामुळे अवयवदान व रक्तदानातून गरजू व्यक्तीला मदत मिळू शकते. मात्र देशात अवयवदानाचे प्रमाण अद्याप अत्यल्प असल्याने अवयवदानाबाबत समाजात अधिक व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

याचवेळी त्यांनी सोबतच वैदिक, धार्मिक वा नोंदणी पद्धतीचा विवाह असो तो सामाजिक उपक्रमांनी साजरा व्हावा, अशी इच्छा असल्याने पती-पत्नीने रक्तदान करत विवाह सोहळ्याला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. या माध्यमातून विवाहाच्या निमित्ताने एक वेगळा आणि सकारात्मक पायंडा घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. यानिमित्ताने जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी नवदाम्पत्यास शुभेच्छा कळविल्या आहेत.






*अमळनेर : सामाजिक बांधिलकी जपत वैवाहिक जीवनाची सुरूवात करण्याच्या उद्देशातून गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी नोंदणी पद्धतीने विवाहबद्ध झालेले ॲड. सारांश सोनार व ॲड. पूजा सुरसुरे हे तरुण दाम्पत्य. दुसऱ्या छायाचित्रात रक्तदान करताना ॲड. सारांश सोनार. शेजारी ॲड. पूजा सुरसुरे.*




*अमळनेर : येथील 'विजया टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स'चे संचालक चैतन्य चौधरी यांना वाढदिवसानिमित्त बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना दै. 'ग्लोबल महातेज'चे कार्यकारी संपादक भरत पाटील, मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी, ब्युरो चीफ रजनीकांत पाटील, संजय सोनवणे. शेजारी प्रकाश चौधरी व मनोज पवार.*

# धक्कादायक : दोन चिमुरड्यांसह पती-पत्नीची आत्महत्या

## टाकरखेड्यात पहाटेच्या सुमारास रेल्वेखाली झोकून देत संपविले जीवन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील टाकरखेडा येथे कामानिमित्त वास्तव्यास असलेल्या दाम्पत्याने आपल्या दोन चिमुरड्यांसह रेल्वेखाली झोकून देत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी पहाटे ४ ते ५ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



सुनील अमृत भिल (वय २६) आणि त्यांची पत्नी पार्वती भिल (वय २३) हे मूळचे रणाईचे (ता. अमळनेर) येथील असून, कामानिमित्त टाकरखेडा येथे राहत होते. ते मुलगा सनी (वय ६ वर्षे) आणि अंगणवाडीत जाणारा मुलगा राज (वय ३ वर्षे) यांना सोबत घेऊन पहाटेच्या सुमारास घरातून बाहेर पडल्याचे समजते. त्यानंतर चौघांनी धावत्या रेल्वेखाली झोकून देत आत्महत्या केली. पहाटे पावणेपाचच्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी पोलिसांना दिली.

या घटनेचे वृत्त कळताच पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे, हवालदार संदेश पाटील, विजय भोई, योगेश बागूल आणि राहुल पाटील यांना घटनास्थळी पाठविण्यात आले. पोलिसांनी पंचनामा करण्याची कार्यवाही सुरू केली असून, या घटनेमागील कारणांचा तपास केला जात आहे. दरम्यान, एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याने टाकरखेडा तसेच रणाईचे परिसरात शोककळा पसरली असून, या घटनेने सर्वांनाच धक्का बसला आहे.

# खवशीच्या तलावात बुडून बाप-लेकाचा दुर्दैवी मृत्यू

## मुलाला वाचविण्यासाठी घेतली वडिलांनी पाण्यात उडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील खवशी येथील तलावात बुडाल्याने बाप-लेकाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसात ते आठ वाजेदरम्यान घडली. विरेंद्र ऊर्फ विरू अण्णा तलवारे (वय ७ वर्षे) हा तलावाच्या पाण्यात उतरल्याचे लक्षात येताच त्याचे वडील अण्णा एकनाथ तलवारे (वय ३२) यांनी मुलाला वाचविण्यासाठी पाण्यात उडी घेतली. मात्र, तलावातील गाळात दोघेही अडकल्याने त्यांचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार विरू सकाळी तलावाजवळ खेळत होता. खेळता-खेळता तो तलावाच्या पाण्यात उतरला. मुलगा पाण्यात गेल्याचे निदर्शनास येताच अण्णा तलवारे यांनी क्षणाचाही विलंब न करता त्याला वाचविण्यासाठी तलावात धाव घेतली. मात्र, तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला असल्याने दोघेही त्यात अडकले. मुलाला वाचविण्याच्या प्रयत्नात वडिलांचाही जीव गेला. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तलावाकडे धाव घेतली. या घटनेने खवशी गावावर शोककळा पसरली असून, तलावातील गाळ आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अण्णा तलवारे आणि त्यांचा मुलगा विरू हे मूळचे आर्वी, ता. जि. धुळे येथील रहिवासी होते. उदरनिर्वाहासाठी ते सध्या अण्णा तलवारे यांची सासरवाडी असलेल्या खवशी येथे वास्तव्यास होते. या दुर्दैवी घटनेने



तलवारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, बाप-लेकाच्या अकाली निधनाने खवशीसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### रक्षाबंधनानिमित्त बाजार फुलला

अमळनेर : रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर येथील बाजारात आज महिला भगिनींची राखी खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १५ ते २० टक्के राख्यांच्या दरात वाढ झाली असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. त्याचप्रमाणे रक्षाबंधनानिमित्त बहिणीकडून भावाला नारळ भेट म्हणून दिले जात असल्याने नारळ विक्रीच्या दुकानांमध्येही गर्दी दिसून आली.

# पत्रकारावरही गुन्हा; माध्यमस्वातंत्र्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न

## 'व्हॉईस ऑफ मीडिया'चा आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुण्यातील प्रतिष्ठित सी.ओ. पी. टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीच्या वसतिगृहातील वादाला आता नवे वळण मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपासून सुरू झालेल्या या प्रकरणात विद्यार्थी संघटनांमधील संघर्षानंतर पोलिसांत गुन्हे दाखल झाले आणि आता 'एबीपी माझा'चे पुणे प्रतिनिधी पत्रकार मंदार गोंजारी यांच्याविरोधातही तक्रार गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त समोर आले आहे. विद्यापीठ प्रशासनाने पत्रकाराने परवानगीशिवाय वसतिगृह परिसरात प्रवेश केल्याचा आरोप करत कायदेशीर तक्रार केली आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर व्हॉईस ऑफ मीडिया व्ही.ओ. एम. इंटरनॅशनल फोरमने तीव्र नाराजी व्यक्त करत पत्रकारांवर अशा प्रकारे कायदेशीर कारवाई करून माध्यमांवर दबाव आणण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, अशी भूमिका घेतली आहे.

सी. ओ. पी. परिसरातील घटनेनंतर पोलिसांनी आधी ए.बी.व्ही.पी. सदस्याच्या तक्रारीवरून एन.एस.यू.आय. आणि युवक काँग्रेसशी संबंधित ५० ते ६० कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाच्या तक्रारीवरून आणखी एक गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर पत्रकार मंदार गोंजारी यांनी सी.ओ.पी. परिसरातील विद्यार्थ्यांच्या कथित प्रश्नांबाबत केलेले वृत्तांकनही चर्चेत आले आहे. एबीपी माझाच्या अधिकृत संकेतस्थळावर गोंजारी यांच्या नावाने सी ओ पी प्रकरणावरील वृत्त प्रकाशित झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर पत्रकाराने वृत्तांकन करणे हा पत्रकारितेचा मूलभूत अधिकार आणि कर्तव्याचा भाग आहे. एखाद्या पत्रकाराने नियमांचे उल्लंघन केले असल्यास कायदा आपले काम करेल; मात्र पत्रकाराने केलेल्या वृत्तांकनामुळे प्रशासन किंवा सत्ताधारी अस्वस्थ झाले म्हणून पत्रकाराविरोधात कारवाई होत असेल, तर हा माध्यमस्वातंत्र्यासाठी गंभीर इशारा आहे, अशी भूमिका व्हॉईस ऑफ मीडिया व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमने व्यक्त केली आहे.

सी.ओ.पी. प्रकरणात विद्यार्थ्यांच्या शुल्क, शिष्यवृत्ती आणि विद्यार्थ्यांशी संबंधित प्रश्नांवरून वाद निर्माण झाल्याचे विविध वृत्तांतून समोर आले आहे. एका विद्यार्थिनीने सुरूवातीला कॉलेजकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याचे सांगितले होते; त्यानंतर तिने दुसऱ्या व्हिडिओमध्ये आपल्यावर दबाव निर्माण झाल्याचे सांगत राजकीय वादात आपल्याला ओढू नये, असे आवाहन केले. म्हणूनच या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न काय आहेत, त्यावर प्रशासनाची भूमिका काय आहे, विद्यार्थी संघटनांमध्ये नेमका संघर्ष कशामुळे झाला आणि पत्रकाराविरोधातील तक्रारीमागील वास्तविक कारण काय आहे, हे स्पष्टपणे समोर येणे गरजेचे आहे.

व्हॉईस ऑफ मीडिया व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला.

म्हस्के म्हणाले, की विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर पत्रकाराने बातमी केली म्हणून पत्रकाराला गुन्ह्याच्या चौकटीत आणण्याचा प्रयत्न होत असेल, तर हा केवळ एका पत्रकाराचा प्रश्न राहात नाही; हा संपूर्ण माध्यमविश्वाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न बनतो.

"पत्रकार चुकीचा असेल तर कायदा तपास करेल, पुरावे असतील तर न्यायालयीन प्रक्रिया होईल. मात्र पत्रकाराने प्रश्न उपस्थित केले म्हणून त्याच्यावर दबाव निर्माण करणे, त्याला घाबरवणे किंवा गुन्ह्याच्या माध्यमातून त्याची लेखणी रोखण्याचा प्रयत्न करणे कोणत्याही परिस्थितीत मान्य केले जाणार नाही," अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

सरकारने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे उत्तर देण्याऐवजी त्यांचे प्रश्न मांडणाऱ्या माध्यमांकडे संशयाने पाहिले जात असेल, तर ही लोकशाहीच्या दृष्टीने चिंतेची बाब असल्याचेही म्हस्के यांनी नमूद केले. "महाराष्ट्रातील पत्रकार निर्भयपणे काम करतील. माध्यमांवर कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न झाला तर व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम पत्रकारांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील," असा इशाराही त्यांनी दिला.

व्हॉईस ऑफ मीडिया व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांनीही सी.ओ.पी. प्रकरणातील पत्रकाराविरोधातील कारवाईचा तीव्र शब्दांत निषेध केला.

चोरडिया म्हणाले, की पत्रकार हा समाजातील प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविणारा महत्त्वाचा दुवा आहे. विद्यार्थ्यांच्या समस्या समोर आणणे, प्रशासनाला प्रश्न विचारणे आणि वस्तुस्थिती जनतेसमोर मांडणे हे पत्रकाराचे कर्तव्य आहे. "पत्रकाराने बातमी केली म्हणून त्याच्यावर गुन्हा दाखल होणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. पत्रकारितेवर दबाव आणण्याचा कोणताही प्रयत्न महाराष्ट्रातील पत्रकार सहन करणार नाहीत. पत्रकाराच्या लेखणीला घाबरवण्याऐवजी प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत," अशी भूमिका चोरडिया यांनी मांडली.

सी.ओ.पी. प्रकरणात पत्रकाराविरोधात दाखल झालेल्या तक्रारीची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि पत्रकाराला केवळ त्याच्या व्यावसायिक कर्तव्यामुळे लक्ष्य केले जात नाही ना, याचीही चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. सी.ओ.पी. प्रकरण आता केवळ विद्यार्थी संघटनांमधील संघर्षापुरते मर्यादित राहिलेले नाही. विद्यार्थ्यांचे प्रश्न, विद्यापीठ प्रशासनाची भूमिका, राजकीय हस्तक्षेप, विद्यार्थी संघटनांमधील संघर्ष आणि आता पत्रकाराविरोधातील कायदेशीर कारवाई या सर्व मुद्द्यांमुळे प्रकरण अधिक व्यापक झाले आहे. पोलिसांनी सी.ओ.पी. परिसरात राजकीय व्यक्ती आणि कार्यकर्त्यांच्या प्रवेशावर तसेच राजकीय कार्यक्रमांवर काही काळ निर्बंधही लागू केले होते. मात्र प्रश्न असा आहे, की विद्यार्थ्यांचे प्रश्न नेमके काय आहेत? त्यांची उत्तरे कोण देणार? आणि ते प्रश्न जनतेसमोर मांडणाऱ्या पत्रकाराचे संरक्षण कोण करणार?

व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमने स्पष्ट केले आहे की, पत्रकारितेचा आवाज दाबण्याचा कोणताही प्रयत्न झाला तर संघटना पत्रकारांच्या घटनात्मक अधिकारांच्या बाजूने ठामपणे उभी राहील. "पत्रकारांवर दबाव टाकून प्रश्न सुटणार नाहीत. उलट दबाव वाढला की प्रश्न अधिक तीव्रतेने जनतेसमोर येतील. विद्यार्थ्यांना न्याय आणि पत्रकारांना निर्भयपणे काम करण्याचे स्वातंत्र्य मिळणे, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे," अशी भूमिका संघटनेने व्यक्त केली आहे. दरम्यान, पत्रकार मंदार गोंजारी यांच्याविरोधातील तक्रारीसह सी.ओ.पी. प्रकरणातील सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे आणि विद्यार्थी, विद्यापीठ प्रशासन, विद्यार्थी संघटना तसेच पत्रकार,सर्वांची बाजू ऐकून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे आवश्यक आहे. व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम यावर पुढची भूमिका घेणार आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




# लग्न नाकारले आणि शिक्षण घेतले!

## वडिलांनी जमीन विकून लेकीला दिल्लीला पाठवले; संघर्षातून यशाचे शिखर गाठणारी ‘किरण’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगून अनेक विद्यार्थी मोठ्या हिंमतीने मेहनत करत असतात. पाच-पाच, दहा-दहा वर्षे अभ्यास केल्यानंतर मोठ्या परीक्षांमध्ये यश मिळते. त्यासाठी जिद्द, चिकाटी, मेहन या गोष्टी गरजेच्या असतात. दरम्यान, अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र, यातून देखील विद्यार्थी वाट काढत यशाचे शिखर गाठतात. आज आपण बिहारमधील अशाच एका जिद्दी मुलीची यशोगाथा पाहणार आहोत. जिने संघर्षातून, आर्थिक परिस्थिती बेताची असताना देखील मोठे यश मिळविले आहे.

बिहारच्या नवादा जिल्ह्यातील कुंजेला गावातील किरण कुमारी यांनी बीपीएससी परीक्षेत ९६२ वा क्रमांक मिळवून डीएसपी पद पटकावले आहे. आर्थिक अडचणी आणि लग्नाचा ताण असूनही, त्यांनी चिकाटीने प्रयत्न करून गावातील पहिल्या महिला बीपीएससी अधिकारी बनून एक आदर्श निर्माण केला आहे

### लग्नास स्पष्ट नकार, शिक्षणाला होकार

किरण यांचे वडील अर्थात जगदीश प्रसाद यांनी दिलेल्या माहितीनुसार मी कन्या किरण यांना लग्न करण्यास सांगितले होते. कारण त्यांची पुढील शिक्षणाची आर्थिक परिस्थिती अनुकूल नव्हती. पण त्यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. माझ्या लग्नावर जो




काही पैसा खर्च होईल तो शिक्षणावर खर्च झाला पहिजे, असे त्यांनी सांगितले. यानंतर किरण यांच्या वडिलांनी लग्नाचा विचार बदलून त्यांना शिक्षणासाठी दिल्लीला पाठविले. यासाठी त्यांना आपली काही जमीनही विकावी लागली. मात्र, आज ते खूप आनंदी आहेत की किरण यांनी अतिशय मेहनतीने डीएसपीचे पद मिळविले आहे.

### दुसऱ्या प्रयत्नात मिळाले यश

जगदीश प्रसाद यांनी सांगितले, की किरण पहिल्याच प्रयत्नात प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्या. मात्र मुख्य परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्या. असे असूनही त्या खचल्या नाहीत. त्यांनी आपल्या उणिवांवर मात केली आणि कठोर परिश्रम, समर्पण व दृढनिश्चयाच्या जोरावर हे यश मिळविण्यासाठी स्वतःची ताकद निर्माण केली. किरण यांनी हे यश दुसऱ्या प्रयत्नात मिळविले.

### निकाल जाहीर झाल्यानंतरही किरण यांनी बराच काळ कोणालाही माहिती दिली नाही

दरम्यान, निकाल जाहीर झाल्यानंतरही किरण यांनी बराच काळ ही गोष्ट गुप्त ठेवली होती. नोकरीवर रुजू होण्यापूर्वी कागदपत्रांच्या पडताळणीची वेळ आली तेव्हाच त्यांच्या कुटुंबियांना याबद्दल कळाले. जेव्हा किरण यांच्या वडिलांनी त्यांना बीपीएससीच्या निकालांबद्दल विचारले तेव्हा किरण यांनी त्यांना काहीही सांगितले नाही. किरण यांच्या वडिलांना वाटले, की कदाचित यावेळीही किरण यांची निवड झाली नसेल. पण जेव्हा किरण पडताळणीच्या कागदपत्रांसह नवादा येथे परत आल्या तेव्हा त्यांनी जाहीर केले, की त्यांची डीएसपी पदासाठी निवड झाली आहे. त्यांचा नियुक्तीपत्र स्वीकारतानाचा फोटो समोर आल्यानंतरच लोकांना किरण यांच्या या यशाबद्दल कळाले.

### ५ ते ६ वर्षांच्या असताना त्यांचे कुटुंब नवादात स्थलांतरित

किरण ५ ते ६ वर्षे वयाच्या असताना त्यांचे कुटुंब नवादा येथे स्थलांतरित झाले. नवादा येथील प्राथमिक शिक्षणानंतर किरण यांनी एक आठवडा पाटणा येथे घालवला. त्यानंतर त्या दिल्ली येथे गेल्या. किरण यांनी नवादा येथील प्रोजेक्ट कन्या स्कूलमधून दहावी, आरएमडब्ल्यू कॉलेजमधून इंटरमिजिएट आणि पदवी, तसेच दिल्लीतून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. किरण यांचे मूळ गाव रोह ब्लॉकमधील कुंजेला आहे, परंतु त्यांचे कुटुंबीय सध्या नवादा जिल्हा मुख्यालयाच्या मिर्झापूर परिसरात राहतात. त्यांची आई रंजू कुमारी, मिर्झापूर वॉर्ड १ मध्ये अंगणवाडी सेविका आहेत, तर त्यांचे वडील जगदीश प्रसाद कपड्यांचे एक छोटे दुकान चालवतात. किरण या चार भावंडांमध्ये सर्वांत लहान आहेत. त्यांची मोठी बहीण प्रिया या जमुई येथील पोस्ट ऑफिसमध्ये कार्यरत आहेत. तर मोठा भाऊ पंकज कुमार, नागपूरमध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत. दुसरा भाऊ धीरज कुमार कर्नाटकात कार्यरत आहेत. आता किरण डीएसपी बनल्या असून, स्वतःच्या कुटुंबासह संपूर्ण जिल्ह्याला गौरव मिळवून देत आहेत.

### मोठ्या भगिनी प्रिया यांचे विशेष योगदान

किरण यांच्या यशात त्यांच्या मोठ्या भगिनीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. किरण यांनी दिल्लीत तीन वर्षे तयारी केली. त्यांचे वडील सांगतात, की किरण यांना परीक्षेच्या तयारीच्या काळात पैसे पाठवू शकत नव्हतो. तेव्हा किरण यांच्या मोठ्या भगिनी प्रिया यांनी त्यांना आर्थिक मदत केली. यामुळेच किरण यांचे त्यांच्या मोठ्या भगिनी प्रिया यांच्याशी घट्ट नाते आहे. त्यांनी बराच काळ मोठ्या भगिनीसोबत घालवला आहे. किरण डीएसपी झाल्यानंतरही त्यांच्या यशाची बातमी देण्यासाठी सर्वप्रथम त्या जमुईमधील त्यांच्या मोठ्या भगिनी प्रिया यांच्याकडे गेल्या होत्या.

# खानदेशातून काशी-अयोध्या-प्रयागराज प्रवास सोपा

## भुसावळमार्गे अमृत भारत एक्स्प्रेस नियमित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भुसावळ मार्गे प्रयागराज -मुंबईकडे प्रवास करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी. मध्य रेल्वेने मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनस प्रयागराज विशेष गाडी क्रमांक ०४१५१/०४१५२ नियमित केली आहे. ही गाडी आता अमृत भारत एक्सप्रेस गाडी क्रमांक २०४३५/२०४३६ म्हणून धावेल. या गाडीला भुसावळ स्थानकावर थांबा देण्यात आल्याने जळगावसह संपूर्ण खान्देशातील प्रवाशांना मोठा फायदा होणार असून पर्यटक आणि भाविकांसाठी मध्य प्रदेशातील निसर्गरम्य स्थळांसह उत्तर प्रदेशातील प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्रांना भेट देणे आता अधिक सोयीचे होणार आहे.



मध्य रेल्वेनुसार, ही गाडी साप्ताहिक अमृत भारत एक्सप्रेस म्हणून धावेल. गाडी क्रमांक २०४३५ एलटीटी-प्रयागराज अमृत भारत एक्सप्रेस २२ ऑगस्ट २०२६ पासून दर शनिवारी सायंकाळी ५:२० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनसवरून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२:४० वाजता प्रयागराजला पोहोचेल. परतीच्या प्रवासात गाडी क्रमांक २०४३६ प्रयागराज-एलटीटी अमृत भारत एक्सप्रेस २१ ऑगस्ट २०२६ पासून दर शुक्रवारी सायंकाळी ६:१० वाजता प्रयागराजहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ३:४५ वाजता एलटीटी येथे पोहोचेल. या सुपरफास्ट ट्रेनला लक्षणीयरीत्या कमी थांबे असतील. ही ट्रेन कल्याण, भुसावळ, इटारसी, जबलपूर आणि सतना स्थानकांवर थांबेल. ट्रेनमध्ये एकूण २२ अमृत भारत डबे असतील. यामध्ये ११ जनरल अनारक्षित डबे, ८ स्लीपर डबे, १ पॅन्ट्री कार आणि २ सामान-सह-दिव्यांग ब्रेक व्हॅन यांचा समावेश आहे. या गाडीला भुसावळ येथे थांबा मिळाल्याने जळगाव, धुळे, नंदुरबारसह खान्देशातील प्रवाशांना प्रयागराज, काशी, अयोध्या तसेच मध्य प्रदेशातील पर्यटनस्थळांकडे जाण्यासाठी ही रेल्वेसेवा उपयुक्त ठरणार आहे. मध्य रेल्वेने प्रवाशांना सविस्तर वेळा आणि थांब्यांसाठी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट देण्याची किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करण्याची विनंती केली आहे. तिकीट बुकिंगसाठी रेलवन ॲपचा वापर करता येईल.


# सरकारी इंजिनिअरचा राजेशाही थाट!

## वाढदिवसाच्या दिवशी हत्तीवरून मिरवणूक, केक पाहून चकीत व्हाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सरकारी इंजिनिअरचा राजेशाही थाट व्हायरल झाला आहे. भ्रष्टाचाराचा आरोप झालेल्या इंजिनिअरची चक्क वाढदिवसाच्या दिवशी हत्तीवरून मिरवणूक काढण्यात आली. मध्य प्रदेशच्या उज्जैन जिल्ह्यातून चकीत करणारा प्रकार समोर आला आहे. उज्जैनच्या पश्चिम विभागाच्या वीज वितरण कंपनीत सहायक अभियंता असलेल्या रविकांत मालवीय याच्या वाढदिवसाची पार्टी सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. या इंजिनिअरची चक्क हत्तीवरून मिरवणूक काढल्याचेही समोर आले आहे. शासकीय सुटीच्या दिवशी कार्यालय उघडून वाढदिवसाची भव्य दिव्य पार्टी आयोजित केली होती. या पार्टीतील केक देखील हटके होता. परंतु सरकारी कार्यालयातील खासगी कार्यक्रम आयोजित केल्याने वादाला तोंड फुटले आहे.

कार्यालयात इंजिनिअरचा राजेशाही थाट होता. या इंजिनिअरने ढोल-ताशांच्या गजरात सरकारी कार्यालयात प्रवेश केला. कार्यालयात




पोहोचल्यानंतर केक कापून वाढदिवस साजरा केला. या वाढदिवसाचे फोटो आणि व्हिडिओ समोर आल्यानंतर या पार्टीवरून अनेक सवाल उपस्थित केले जाऊ लागले आहेत. वाढदिवसाला फक्त राजेशाही थाट नव्हता. तर केक देखील नोटांच्या बंडलचा होता. केकवर फक्त सजावटीसाठी बनावट नोटा चिकटविल्या होत्या. एका इंजिनिअरने केलेल्या शक्ती प्रदर्शनाची जोरदार चर्चा होत आहे.

### एका दिवसाआधी इंजिनिअरवर भ्रष्टाचाराचा आरोप

शासकीय कार्यालय रविवारी बंद असते. मग कार्यालय उघडण्याची परवानगी कोणी दिली? कोणत्या बड्या अधिकाऱ्याने शासकीय कार्यालयात वाढदिवसाची पार्टी करण्याची परवानगी दिली आहे का? एका शासकीय कार्यालयात खासगी कार्यक्रमाची परवानगी कशी काय दिली जाऊ शकते? वाढदिवसाच्या दिवशी सरकारी कर्मचारी उपस्थित होते का? शासकीय सुट्टी होती, तर कर्मचाऱ्यांनी हजेरी कशी लावली? असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. तत्पूर्वी, एका दिवसाआधी या इंजिनिअरवर भ्रष्टाराचाराचा गंभीर आरोप करण्यात आला होता. त्यामुळे इंजिनिअर रविकांत मालवीय चर्चेत आला होता. कार्यालयातील वाढदिवसाच्या पार्टीवरून आता अनेक सवाल उपस्थित केले जात आहेत. कार्यालयात या इंजिनिअरने मित्रांसोबत डान्स केला. त्यांचा पाहुणचार देखील केला. सरकारी कार्यालयात भारतीय नोटांची प्रतिमा असलेला केक कापल्याने अनेक सवाल उपस्थित केले जात आहे. या प्रकारचा केक कापून इंजिनिअरने अपमान केल्याचा आरोप सोशल मीडियावर केला जात आहे.

# अँटिलियामधील सिक्युरिटी गार्डला किती पगार? आकडा वाचून धक्काच बसेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेल्या मुकेश अंबानी यांच्या अँटिलियामध्ये काम करणाऱ्या सिक्युरिटी गार्डला किती पगार आहे? जाणून घ्या. मुकेश अंबानी भारतातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती आहेत. ते त्यांच्या पत्नी नीता अंबानी आणि कुटुंबासोबत ‘अँटिलिया’मध्ये राहतात. हे जगातील सर्वांत आलिशान घरांपैकी एक आहे. या आलिशान घराला चालविण्यासाठी किती लोकांची गरज असते, हा प्रश्न अनेकदा लोकांच्या मनात येतो. मीडिया रिपोर्टनुसार, ‘अँटिलिया’मध्ये ५०० हून अधिक नोकर काम करतात. हे कर्मचारी घरातील रोजच्या कामांना सुरळीतपणे चालवण्यासाठी मदत करतात.

अँटिलियामध्ये काम करणाऱ्या सिक्युरिटी गार्डला किती पगीर



असेल? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. अँटिलियामध्ये काम करणाऱ्या नोकरांना चांगला पगार मिळतो. इंडिया टीव्हीच्या अहवालानुसार अनेक नोकरांचा मासिक पगार १.५ लाख ते २ लाख रुपयांच्या दरम्यान आहे. हा पगार खूप आकर्षक असून त्यामुळे त्यांचे जीवन चांगल्या प्रकारे चालते.

अँटिलियामध्ये सिक्यूरिटी गार्ड म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला देखील १.५ लाख ते २ लाख रुपये पगार असल्याचे बोलले जात आहे. याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

पगाराशिवाय ‘अँटिलिया’च्या कर्मचाऱ्यांना अनेक इतर सुविधाही मिळतात. त्यांना कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांप्रमाणे मेडिकल इन्शुरन्स आणि इतर फायदे दिले जातात. अँटिलियामध्ये काम करणाऱ्यांचा पगार आणि सुविधा त्यांच्या काम आणि जबाबदाऱ्यांनुसार ठरवल्या जातात. हाऊसकीपिंग, सिक्युरिटी, शेफ, पर्सनल अटेंडंट असे प्रत्येक कर्मचारी घर सुरळीत चालवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

# जब सारे रास्ते हो जाएं बंद तो कौवे को बना लें गुरू, जीवन में जरूर मिलेगी सफलता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कौवा सिखाता है कि हालात जैसे भी हों, खुद को ढालना सीखो। वह छोटी-छोटी चीजों से गुजारा कर संतोष में जीना सिखाता है। कौवा हमेशा सतर्क रहता हैं, इसलिए सावधानी सफलता की पहली शर्त है। मुश्किल समय में भी कौवा हार नहीं मानता और कोशिश करता रहता है। कौवा मौका पहचानता है, यानी सही समय पर सही कदम उठाना जरूरी है। वह भोजन



जमा करके भविष्य की तैयारी करना सिखाता है। कौवा अपनी आवाज से दूसरों को सतर्क करता है, यानी संवाद जरूरी है। वह सिखाता है कि साधारण दिखने वाला भी बुद्धिमान हो सकता है। कौवा हमें बतात है कि लगातार प्रयास से ही जीवन में आगे बढा जा सकता है।

# काजू-बदाम, अक्रोड नव्हे; ‘या’ स्वस्त सुकामेव्यामध्ये असते सर्वाधिक प्रोटीन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

काजू-बदाम महाग असूनही त्यात सर्वाधिक प्रोटीन असते, असे अनेकांना वाटते. पण एका स्वस्त आणि सहज उपलब्ध नट्समध्ये यापेक्षाही भरपूर प्रोटीन असते, हे आकडे पाहिल्यावर तुम्हालाही आश्चर्य वाटेल! आजकाल आहाराबाबत जागरूकता वाढली आहे. वजन कमी करायचे असो, शरीर तंदुरुस्त ठेवायचे असो किंवा स्नायू मजबूत करायचे असोत, आहारात पुरेशा प्रमाणात प्रथिने म्हणजे प्रोटिन्स असणे महत्त्वाचे मानले जाते.

## आकडे पाहून तुम्हालाही वाटेल आश्चर्य!



प्रथिने म्हटले, की आपल्या डोळ्यांसमोर पनीर, डाळी, सोयाबीन, टोफू किंवा अंडी यांसारखे पदार्थ येतात. मात्र, आपल्या रोजच्या आहारात सहज उपलब्ध असणारी सुकामेवा आणि कडधान्येही प्रथिनांचा चांगला स्रोत ठरू शकतात. विशेष म्हणजे प्रथिनांसाठी काजू, बदाम किंवा पिस्ताच सर्वांत चांगला पर्याय आहे, असे अनेकांना वाटते. हे पदार्थ पौष्टिक नक्कीच आहेत; मात्र त्यांच्या तुलनेत एक स्वस्त आणि सहज उपलब्ध असणारा सुकामेव्यातील हा पदार्थ प्रथिनांच्या बाबतीत पुढे असल्याचे या माहितीतून समोर येते. त्यामुळे रोजच्या आहारात प्रथिने हा घटक वाढवायचा असेल, तर महागडा सुकामेवा घेणेच आवश्यक आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

प्रथिनांसाठी महागड्या सुक्यामेव्याची कितपत गरज? काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड यांसारख्या सुकामेव्यामध्ये प्रथिने, चांगले स्निग्ध पदार्थ, तंतुमय पदार्थ, जीवनसत्त्वे आणि विविध खनिजे असतात. त्यामुळे संतुलित आहाराचा भाग म्हणून त्यांचे सेवन केले जाते. पण या सर्व पदार्थांमध्ये प्रथिनांचे प्रमाण सारखे नसते. विशेष म्हणजे काही महागड्या सुकामेव्यापेक्षा स्वस्त शेंगदाण्यांमध्ये प्रथिनांचे प्रमाण अधिक असल्याचे सांगितले जाते. शेंगदाणे ठरतात प्रोटीनचा किफायतशीर स्रोतबीजन्य सुकामेव्याचा विचार केला, तर शेंगदाणे प्रथिने मिळवण्यासाठी उत्तम आणि तुलनेने स्वस्त पर्याय मानला जातो. उपलब्ध माहितीनुसार, १०० ग्रॅम शेंगदाण्यांमध्ये सुमारे २५ ते २६ ग्रॅम प्रथिने असतात.केवळ प्रथिनेच नव्हेत, तर शेंगदाण्यांमध्ये चांगले स्निग्ध पदार्थ, तंतुमय पदार्थ, मॅग्नेशियम, पोटॅशियम, जीवनसत्त्व ई व नियासिनदेखील असते. त्यामुळे योग्य प्रमाणात शेंगदाण्यांचा आहारात समावेश केल्यास शरीराला विविध पोषक घटक मिळू शकतात.त्यामुळेच महागडे काजू-बदाम खरेदी करण्याऐवजी रोजच्या आहारात शेंगदाण्यांचा योग्य प्रमाणात समावेश करणे हा किफायतशीर पर्याय ठरू शकतो.मग काजू, बदाम व पिस्त्यात प्रथिनांचे प्रमाण किती? आता सर्वांत महत्त्वाची तुलना पाहूया.

१०० ग्रॅममधील प्रथिनांचे प्रमाण लक्षात घेतले, तर सुकामेव्याच्या या पदार्थांमध्ये मोठा फरक दिसून येतो.शेंगदाणे सुमारे २५ ते २६ ग्रॅम प्रथिनेबदाम सुमारे २१.२ ग्रॅम प्रथिनेपिस्ता सुमारे २०.२ ग्रॅम प्रथिनेकाजू सुमारे १८.२ ग्रॅम प्रथिनेअक्रोड सुमारे १५.२ ग्रॅम प्रथिने म्हणजेच काजू, बदाम व पिस्ता महाग असूनही प्रथिनांच्या बाबतीत शेंगदाणे त्यांच्यापेक्षा पुढे असल्याचे या आकडेवारीतून दिसते. सुक्या जर्दाळूमध्ये किती प्रथिने? सुकामेव्यामध्ये सुके जर्दाळू म्हणजेच ड्राय ॲप्रिकॉट याचाही समावेश होतो. उपलब्ध माहितीनुसार, १०० ग्रॅम सुक्या जर्दाळूमध्ये सुमारे ४.८ ग्रॅम प्रथिने असतात. त्याशिवाय त्यामध्ये पोटॅशियम, तंतुमय पदार्थ, अ जीवनसत्त्व आणि बीटा-कॅरोटीनसारखे घटक आढळतात. त्यामुळे सुक्या जर्दाळूचा आहारात मर्यादित प्रमाणात समावेश करता येतो. मात्र, प्रथिनांच्या बाबतीत शेंगदाण्यांची तुलना त्याच्याशी केली, तर फरक स्पष्ट दिसतो.

शेंगदाण्यांमध्ये प्रथिनांचे प्रमाण अनेक पटींनी अधिक आहे.आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी काय घ्यावे? फक्त एखादा एक पदार्थ खाल्ल्याने शरीराची प्रथिनांची गरज पूर्ण होत नाही. त्यामुळे आहारात विविध प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश करणे महत्त्वाचे आहे. शेंगदाण्यांसोबत डाळी, कडधान्ये, पनीर, टोफू, सोयाबीन आणि हिरव्या भाज्यांचा संतुलित आहारात समावेश करता येतो.शेंगदाणे खाताना ते योग्य प्रमाणात आणि शक्यतो कमी मीठ व कमी प्रक्रिया केलेल्या स्वरूपात घेणे चांगले. भिजवून खाण्याची पद्धतही अनेक जण वापरतात; मात्र प्रत्येक व्यक्तीनुरूप आहाराची गरज बदलू शकते. एकूणच, प्रथिनांसाठी नेहमी महागडा सुकामेवा खरेदी करणे आवश्यक नाही. किफायतशीर आणि सहज उपलब्ध असलेले शेंगदाणेही प्रथिनांचा चांगला स्रोत ठरू शकतात. मात्र, १०० ग्रॅम अन्नातील वर नमूद केलेले प्रथिनांचे प्रमाण हे अंदाजे मांडलेले आहत; मात्र प्रत्यक्षात प्रत्येक व्यक्तीच्या आहारातील प्रथिनांची गरज वय, वजन, शारीरिक हालचाल आणि आरोग्यस्थिती यानुसार बदलू शकते.

मंगल पान



# आज रक्षाबंधन : शनी-शुक्राचा समसप्तक योग

## 'या' ३ राशींचे नशीब पालटणार... धनसंपत्ती, करिअरमध्ये मोठा फायदा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्षाबंधन यंदा शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी साजरे केले जाईल. हा दिवस खूप खास आहे. कारण या दिवशी वर्षाच्या दुसऱ्या आणि शेवटच्या - चंद्रग्रहणासोबतच अनेक राजयोग देखील तयार होत आहेत. वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार या दिवशी गुरू कर्क राशीत विराजमान असेल. त्यामुळे हंसराज योगाची निर्मिती होईल. सोबतच सिंह राशीतील सूर्य-बुध यांच्या संयोगाने बुधादित्य योग तयार होत आहे. तसेच मीन राशीत रानी वक्री अवस्थेत बसला आहे. मात्र, तो या राशीत राहत आहे आणि कन्या राशीत संक्रमण करणाऱ्या राक्षसांचा गुरू शुक्र याच्या संयोगाने समसप्तक योग निर्माण करत आहे.

दोन्ही ग्रह एकमेकांसमोर आहेत. त्यामुळे काही राशीच्या लोकांसाठी समसप्तक राजयोग खूप फायदेशीर ठरू शकतो. आर्थिक परिस्थितीबरोबरच करिअर आणि व्यवसायावरही याचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो. तर मग जाणून घेऊया या कोणत्या राशी आहेत.

### रक्षाबंधनात शनी-शुक्र युती का महत्त्वाची आहे?

संपत्ती आणि समृद्धी देणारा शुक्र त्याच्या निम्न राशीत कन्या राशीत बसला आहे. दुसरीकडे रानी वक्री अवस्थेत मीन राशीत संक्रमण करत आहे. अशा परिस्थितीत काही राशीच्या लोकांना शनी-शुक्र समोरासमोर आल्याने विशेष फायदा होऊ शकतो. सप्तक म्हणजे दोन्ही ग्रह सातव्या स्थानावर म्हणजे सुमारे १८० अंश एकमेकांसमोर आहेत किंवा सातव्या वेळी एकमेकांकडे पाहत आहेत. हा योग हा योग रक्षाबंधनाच्या दिवशी तयार होत नाहीये तर शुक्र कन्या राशीत गेल्यानंतर तयार होत आहे आणि तो २ सप्टेंबरपर्यंत तिथेच राहील. जेव्हा शुक्र तूळ राशीत संक्रमण करतो.

वैदिक ज्योतिषशास्त्रात शुक्र हा धन भौतिक सुख, धन, प्रेम, नातेसंबंध, सौंदर्य, संपत्ती आणि वैवाहिक जीवन यांचा कारक मानला जातो. तसंच शनी कर्म, शिस्त, जबाबदारी, संयम, न्याय आणि दीर्घकालीन स्थैर्य यांच्याशी संबंधित असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत प्रेम आणि जबाबदारी, आनंद आणि शिस्त तसंच इच्छा आणि कर्तव्य यांच्यातील संतुलन हा विषय दोन ग्रहांच्या संयोगाने तयार होतो. रक्षाबंधन हा सण भावा-बहिणीच्या प्रेम, संरक्षण



आणि जबाबदारीचा प्रतीक मानला जातो. त्याच वेळी शुक्र देखील प्रेमाने आणि आपुलकीने दिसतो आणि शनी जबाबदारी किवा कर्तव्याशी संबंधित आहे. त्यामुळे समसप्तक योग अत्यंत लाभदायक मानला जातो.

**वृषभ :** या राशीच्या व्यक्तींसाठी सुख, संपत्ती आणि नातेसंबंधांशी संबंधित बाबींमध्ये समसप्तक योगाचा सकारात्मक प्रभाव पडू शकतो. वक्री रानी या राशीच्या अकराव्या घरात आहे आणि शुक्र पाचव्या घरात बसला आहे. अशा परिस्थितीत या राशीच्या लोकांच्या बऱ्याच काळापासून रखडलेल्या काही इच्छा पूर्ण होऊ शकतात. वैवाहिक जीवनात आनंद लाभेल. यामुळे मुलाच्या समस्या दूर होऊ शकतात. आरोग्य चांगले राहणार आहे. विद्यार्थ्यांसाठी वेळ अनुकूल आहे. कला, संगीत, चित्रकला या विषयांच्या विद्यार्थ्यांना विशेष लाभ मिळू शकतात. व्यवसायात नफा मिळण्याची शक्यातही आहे.

**कर्क :** या राशीच्या लोकांसाठीही रक्षाबंधनाचा दिवस चांगला असू शकतो. या राशीचे लोक करत असलेल्या मेहनतीचे पूर्ण फळ मिळू शकते. दीर्घ काळ आपापसून प्रलंबित कामे पूर्ण झाल्याने संपत्तीत वाढ होऊ शकते. शनी दहाव्या घरात असेल आणि शुक्र या राशीच्या तिसऱ्या घरात असेल. अशा परिस्थितीत या राशीच्या लोकांसाठी समसप्तक योग फायदेशीर ठरू शकतो. नोकरदार लोकांना ते करत असलेल्या मेहनतीचे पूर्ण फळ मिळू शकते. सोबतच नवीन संधीही निर्माण होऊ शकतात.

### यंदाचे रक्षाबंधन ७० वर्षांनंतरचा विशेष संयोग!

यंदाचे अर्थात २०२६ चे रक्षाबंधन अत्यंत खास असणार आहे. कारण तब्बल ७० वर्षांनंतर एक विशेष योग जुळून आलेला आहे. या योगामुळे बहिणींना आपल्या भावांना राखी बांधण्यासाठी दिवसभरात तीन महत्त्वाचे शुभ मुहूर्त मिळणार आहेत.

#### यंदाचे रक्षाबंधन खास का आहे?

**१) विशेष संयोग :** या दिवशी 'शतभिषा नक्षत्र' आणि 'अतिगंड योगा'चा संयोग होत आहे.

**२) चंद्राचे स्थान :** या दिवशी चंद्र कुंभ राशीत असणार आहे. असा संयोग अनेक वर्षांनंतर येत असल्याने या वर्षाच्या रक्षाबंधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**३) भद्रेचा अडथळा नाही :** यावर्षी राखी बांधताना 'भद्रेचा' कोणताही अडथळा नसेल. ज्यामुळे बहिणींना राखी बांधण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे.

#### राखी बांधण्यासाठीचे ३ शुभ मुहूर्त

**पहिला मुहूर्त :** सकाळी ६ वाजून ३६ मिनिटांपासून ते सकाळी ९ वाजून ४५ मिनिटांपर्यंत.

**दुसरा मुहूर्त :** दुपारी १२ वाजून ३ मिनिटांपासून ते दुपारी १२ वाजून ५३ मिनिटांपर्यंत.

**तिसरा मुहूर्त :** सायंकाळी ७ वाजून ४३ मिनिटांपासून ते रात्री ९ वाजून ३० मिनिटांपर्यंत.

या शुभ वेळांपैकी तुमच्या सोयीनुसार वेळ निवडून तुम्ही रक्षाबंधनाचा सण साजरा करू शकता.

**वृश्चिक :** या राशीतील लोकांसाठी समसप्तक योग देखील फायदेशीर ठरू शकतो. या राशीच्या लोकांच्या संक्रमण कुंडलीच्या पाचव्या घरात शनी आणि अकराव्या घरात शुक्र बसला आहे. करिअरमध्ये अचानक प्रगती होऊ शकते. बऱ्याच काळापासून रखडलेली कामे पूर्ण होऊ शकतात. मित्रांकडून चांगला फायदा मिळू शकतो. शिवाय मोठ्या लोकांशी संपर्क साधला जाईल. नोकरीत इच्छित पदाच्या दिशेने प्रगती होईल. वेग मंद असला तरी उत्पन्नात वाढ होईल.



## रक्षाबंधन का साजरे केले जाते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भावाने बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी घ्यायची या संकल्पनेचे प्रतीकात्मक सांस्कृतिक रूप म्हणजे रक्षाबंधनाचा सण. रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो म्हणून प्रार्थना करते व भाऊ तिचे रक्षण करण्याचे वचन देतो. राखी बांधताना बहीण आपल्या भावाला सुख, शांती, दीर्घायुष्य लाभावे, अशी मनोमन प्रार्थना करते.

भाऊ आणि बहिणीच्या अतूट नात्याची दोर म्हणजेच रक्षाबंधन. चातुर्मासातील पहिला महिना म्हणजेच श्रावण. श्रावण सुरू होताच वेध लागतात ते रक्षाबंधनाचे. रंगीबेरंगी राख्यांनी बाजारपेठा फुलून जातात. श्रावण पौर्णिमेला रक्षाबंधन साजरे करण्याची प्राचीन परंपरा आपल्याकडे आहे. रक्षाबंधनासंदर्भात उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्येही आढळून येतो. रक्षाबंधनाची सुरूवात सतयुगापासून झाली, असा दावा केला जातो. त्याचबरोबर रक्षाबंधनाला पुराणकाळात नेमके काय म्हटले जायचे? आणि रक्षाबंधनाची सुरूवात साधारण कधीपासून झाली? पुराणात यासंदर्भात कोणकोणत्या कथा आढळतात? ते जाणून घेऊया.

### रक्षासूत्र

राखी म्हणजेच रक्षाला पूर्वीच्या काळी 'रक्षासूत्र' म्हटले जात होते. रक्षासूत्र बांधण्याची परंपरा वैदिक काळापासूनची आहे. हे संरक्षण सूत्र नंतर नवरा बायको, आई-मूल आणि नंतर भाऊ-बहीण यांच्या प्रेमाचे प्रतीक बनले, तर रक्षासूत्राला सामान्य भाषेत राखी म्हणतात. जे वेदातील संस्कृत शब्द 'रक्षिका' या शब्दाचा अपभ्रंश आहे. मध्यकाळात याला राखी म्हटले जाऊ लागले, असे सांगितले जाते. देशाच्या प्रत्येक भागात याला वेगवेगळे नाव आहे. दक्षिण भारतात नारळी पूर्णिमा, बलेव आणि अवनी अवित्तम, तर राजस्थानमध्ये रामराखी आणि चुडाराखी म्हटले जाते.

### श्रीगणेशांना प्रथम राखी

श्रावण पौर्णिमेला साजऱ्या केल्या जाणाऱ्या रक्षाबंधनासंदर्भात अनेक मान्यता आहेत. देशाच्या काही भागात याला गुरू-शिष्य परंपरेचे प्रतीक मानले जाते. राजा दशरथ आणि श्रावण बाळ भेट प्रसंगाशीही रक्षाबंधनाचा संबंध जोडला जातो. प्रथमेश असलेल्या गणपती बाप्पांना प्रथम राखी अर्पण करावी, असे मानले जाते. यानंतर श्रावण बाळाच्या नावाने एक राखी काढून ठेवावी आणि त्याला ती समर्पित करावी. याशिवाय आपल्याला प्राणवायू देणाऱ्या वृक्षांनाही आपण एक राखी बांधू शकतो.

### महाभारतातील रक्षाबंधन

रक्षाबंधनाशी संबंधित महाभारतकालीन गोष्ट सांगितली जाते. एकदा भगवान श्रीकृष्णांच्या हाताला दुखापत झाली आणि रक्तस्राव होऊ लागला. द्रौपदीने साडीच्या पदराचा तुकडा फाडून श्रीकृष्णांच्या हाताला बांधला. यामुळे रक्तस्राव थांबला. कालांतराने जेव्हा दुःशासनाने द्रौपदीचे वस्त्रहरण करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा श्रीकृष्णांनीच वस्त्र वाढवून या बंधनाचे ऋण फेडले, असे सांगितले जाते. याशिवाय पांडवांचा विजय निश्चित करण्यासाठी श्रीकृष्णांनी युधिष्ठिराला रक्षाबंधन साजरे करावे, असे सल्ला दिला होता, अशी आख्यायिका आहे.

## राखी बांधताना किती गाठी बांधतात?

### जाणून घ्या यामागील खास मान्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्षाबंधनाच्या दिवशी राखी बांधताना बहीण भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्याच्या सुखी, निरोगी आयुष्यासाठी प्रार्थना करते. पण राखी बांधताना किती गाठी बांधायच्या? याबाबत अनेकांच्या मनात प्रश्न असतो. कारण भाऊ-बहिणीचे नाते, सुख-समृद्धी आणि आयुष्यभराची साथ यांच्याशी या गाठींचा संबंध जोडला जातो. चला तर मग राखीला किती गाठी बांधाव्या आणि त्यामागची खास मान्यता नेमकी काय आहे, ते जाणून घेऊया.



### राखीला किती गाठी बांधाव्यात?

राखीचा धागा छोटा असला तरी त्यामध्ये भाऊ-बहिणीच्या नात्याशी जोडलेल्या अनेक भावना असतात. पारंपरिक मान्यतेनुसार राखी बांधताना तीन गाठी बांधल्या जातात. प्रत्येक गाठीचा वेगळा अर्थ असल्याचे मानले जाते. हे अर्थ कोणते ते जाणून घेऊया.

### पहिली गाठ : भाऊ-बहिणीचे प्रेम

पहिली गाठ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे आणि त्यांच्या घट्ट नात्याचे प्रतीक मानली जाते. लहानपणी एकत्र खेळणे, मजा करणे, छोट्या गोष्टींवरून भांडणे आणि पुन्हा लगेच एकत्र येणे, या सगळ्या आठवणी या नात्याला खास बनवितात. हे प्रेम आणि आपलेपणा कायम राहावा, अशी इच्छा पहिल्या गाठीमागे असते.

### दुसरी गाठ : सुख आणि समृद्धी

दुसरी गाठ भावाच्या आयुष्यात सुख, चांगले आरोग्य, यश आणि समृद्धी यावी, यासाठीच्या शुभेच्छांचे प्रतीक मानली जाते. बहीण भावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना करते. त्याचबरोबर भावानेही आपल्या बहिणीच्या आयुष्यात आनंद आणि यश कायम राहावे, अशी इच्छा व्यक्त करण्याचा यामागचा भाव आहे.

### तिसरी गाठ : विश्वास आणि आयुष्यभराची साथ

तिसरी गाठ भाऊ-बहिणीमधील विश्वास, सुरक्षितता आणि एकमेकांना आयुष्यभर साथ देण्याच्या भावनेशी जोडली जाते. आयुष्यात कितीही अडचणी आल्या तरी एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे, गरजेच्या वेळी मदत करणे आणि हे नाते कायम जपणे, असा या गाठीचा अर्थ मानला जातो. त्यामुळे राखीला तीन गाठी बांधण्याची परंपरा ही केवळ एक रीत नसून भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, सुख-समृद्धी आणि विश्वास या तीन महत्त्वाच्या भावनांचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे यंदा भावाला राखी बांधताना या तीन गाठींचा अर्थही नक्की लक्षात ठेवा.

## भद्राकाळ म्हणजे काय? या काळात राखी का बांधू नये?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भावा-बहिणीच्या अथांग प्रेमाचा आणि विश्वासाचा सण म्हणजे रक्षाबंधन. या दिवशी बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या उदंड आयुष्यासाठी आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करते. सनातन धर्मात कोणत्याही शुभ किंवा मांगलिक कार्यापूर्वी शुभ मुहूर्त पाहण्याची परंपरा आहे. म्हणूनच रक्षाबंधनाला 'भद्रा काल' विशेष लक्षात ठेवला जातो आणि या काळात राखी बांधणे पूर्णपणे वर्ज्य मानले जाते.



### कोण आहे भद्रा?

पौराणिक कथांनुसार भद्रा ही सूर्यदेव आणि छाया यांची कन्या असून शनिदेवाची सख्खी बहीण आहे. भद्राचे रूप अत्यंत भयानक - काळा वर्ण, लांब केस आणि मोठे दात असे वर्णन केले जाते. तिचा स्वभाव जन्मापासूनच अत्यंत उग्र आणि रागीट होता. जन्माला आल्यापासूनच भद्रा मुनींच्या यज्ञात, पूजेत आणि धार्मिक कार्यात अडथळे आणू लागली. तिच्या या स्वभावामुळे सूर्यदेव तिच्या विवाहाबद्दल चिंतेत पडले, पण तिच्या भयानक रूप आणि स्वभावामुळे अनेकांनी विवाहाचा प्रस्ताव नाकारला. अखेर सूर्यदेवांनी ब्रह्मदेवाकडे मदत मागितली.

### पंचांगात विशेष स्थान

भद्राचा उपद्रव रोखण्यासाठी ब्रह्मदेवाने तिला एका विशिष्ट वेळेत राहण्याचे स्थान दिले. त्यांनी सांगितले, की तू पृथ्वी, स्वर्ग आणि पाताळ या तिन्ही लोकांमध्ये ठरवून दिलेल्या वेळेनुसार भ्रमण करशील. या काळात जो व्यक्ती शुभ कार्य करेल किंवा तुझा आदर करणार नाही, त्याच्या कार्यात तू अडथळा आणू शकतेस. त्यानुसार ब्रह्माजींनी हिंदू पंचांगातील 'विष्टीकरण'मध्ये भद्राला स्थान दिले. पंचांगाच्या ११ करणांपैकी 'विष्टीकरण' म्हणजेच भद्रा मानली जाते.

### भद्रा काळात राखी का बांधत नाहीत?

भद्रा काल अत्यंत उग्र आणि विनाशकारी मानला जातो. त्यामुळे या काळात विवाह, गृहप्रवेश किंवा राखी बांधणे यांसारखी मंगल कार्ये केली जात नाहीत.

पौराणिक कथेनुसार रावणाची बहीण शूर्पणखेने भद्रा काळातच रावणाला राखी बांधली होती, ज्यामुळे रावणाच्या संपूर्ण कुळाचा विनाश झाला अशी आख्यायिका आहे. म्हणूनच भद्रा काळात भावाच्या हातावर राखी बांधणे अशुभ मानले जाते.

### यंदा रक्षाबंधनाला भद्राकाळ आहे की नाही?

यावर्षी रक्षाबंधनाचा सण शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी साजरा केला जाणार आहे. ज्योतिषाचार्यांच्या आणि पंचांगाच्या गणनेनुसार या दिवशी सूर्योदयापूर्वीच भद्रा समाप्त होणार आहे. त्यामुळे यंदा भद्रा काळाची कोणतीही अडचण नसेल. दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी सूर्योदयापासूनच भद्रा मुक्त शुभ मुहूर्तावर बहिणी आपल्या भावांना आनंदाने राखी बांधू शकतात.

## रक्षाबंधनाच्या दिवशी सर्वप्रथम भगवान श्रीगणेशांना राखी का बांधतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अवघ्या देशभरात ज्या सणाची आतुरतेने वाट पाहण्यात येत आहे, तो रक्षाबंधनचा सण यंदा शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी आहे. रक्षाबंधन सण हा भाऊ-बहिणींमधील प्रेम आणि जिव्हाळ्याचा सण आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावांच्या मनगटावर राखी बांधतात आणि भाऊ त्यांचे रक्षण करण्याचे वचन देतात. या दिवशी राखी बांधण्याशी संबंधित अनेक धार्मिक परंपरा आहेत. मात्र काही कुटुंबांमध्ये रक्षाबंधनाच्या दिवशी सर्वप्रथम भगवान गणेशाला राखी बांधण्याची परंपरा आहे. ही प्रथा नेमकी का पाळली जाते, याबाबत अनेकांच्या मनात उत्सुकता असते. जाणून घेऊया या परंपरेबद्दल आणि धार्मिक मान्यतेबाबत.

### रक्षाबंधनाला सर्वप्रथम बाप्पांना राखी का बांधतात?

काही ठिकाणी कौटुंबिक परंपरेनुसार रक्षाबंधनाला भावाच्या मनगटावर राखी बांधण्यापूर्वी गणपती बाप्पांना राखी अर्पण करण्याची परंपरा मानली जाते. याचे कारण म्हणजे हिंदू धर्मपरंपरेत भगवान श्रीगणेशांना विघ्नहर्ता आणि शुभकार्याचा अधिपती मानले जाते. कोणतेही मंगलकार्य सुरू करण्यापूर्वी गणेशपूजन करण्याची प्रथा आहे. त्याच भावनेतून काही कुटुंबांमध्ये रक्षाबंधनाच्या विधीलाही प्रथम गणेशपूजन करून श्रीगणेशांना राखी किंवा रक्षासूत्र अर्पण केले जाते. धार्मिक मान्यतेनुसार श्रीगणेशांना प्रथम राखी बांधल्याने रक्षाबंधनाचा विधी निर्विघ्नपणे पार पडावा, कुटुंबावर मंगलकृपा राहावी आणि सर्वांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, अशी श्रद्धा आहे. त्यानंतर बहीण भावाला राखी बांधते.

### बाप्पांना प्रथम राखी कशी बांधावी? पूजा पद्धत...

रक्षाबंधनाच्या दिवशी प्रथम घरातील देवघर स्वच्छ करून भगवान श्रीगणेशांची पूजा करावी. त्यानंतर श्रीगणेशांना राखी अर्पण करून भावाला राखी बांधण्याची प्रथा काही कुटुंबांत पाळली जाते. पूजा साहित्य - कुंकू, अक्षता, फुले, दुर्वा, धूप-दीप, नैवेद्य, पाणी आणि राखी.

### पूजा पद्धत

❋ सर्वप्रथम स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत.

❋ गणेशमूर्तीसमोर दिवा लावून धूप दाखवावा.

❋ श्रीगणेशांना पाणी, कुंकू, अक्षता, फुले आणि दुर्वा अर्पण कराव्यात.

❋ श्रीगणेशांची मनोभावे पूजा करून नैवेद्य दाखवावा.

❋ श्रीगणेशांना राखी अर्पण करून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करावी. त्यानंतर भावाला पाटावर बसवून औक्षण करावे. भावाच्या कपाळावर कुंकू किंवा गंध लावून अक्षता लावाव्यात.

❋ उजव्या मनगटावर राखी बांधावी आणि मिठाई भरवावी.

❋ भाऊ बहिणीला प्रेमाने भेटवस्तू देऊन तिच्या सुख-समृद्धीची कामना करतो.

❋ श्रीगणेशांना राखी बांधण्यामागे आणखी एक श्रद्धा

धार्मिक मान्यतेनुसार भगवान श्रीगणेश हे बुद्धी, विवेक आणि मंगलतेचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे राखी बांधताना श्रीगणेशांचे स्मरण केल्याने भाऊ-बहिणीच्या नात्यात प्रेम, विश्वास आणि संरक्षणाची भावना कायम राहावी, अशी धार्मिक भावना व्यक्त केली जाते.

### पूजेची पद्धत काय? परंपरा, धार्मिक महत्त्व कमी लोकांना माहिती...



### गणपतीला राखी बांधणे आवश्यक आहे का?

श्रीगणेशांना राखी बांधणे ही श्रद्धेची बाब असून, ज्या कुटुंबात ही परंपरा आहे त्यांनी ती भक्तिभावाने पाळू शकतात. रक्षाबंधनाचा मुख्य भाव मात्र भाऊ-बहिणीतील प्रेम, स्नेह आणि परस्पर रक्षणाची भावना हाच आहे. प्रत्येक कुटुंबात हा एक अनिवार्य विधी म्हणून पाळला जात नाही. अनेक कुटुंबांमध्ये रक्षाबंधनाची सुरूवात गणपतींच्या पूजेने होते, तर काही ठिकाणी भावाला थेट राखी बांधण्याची परंपरा पाळली जाते.

### राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त

**रक्षाबंधन :** शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६

**पौर्णिमा तिथी :** दि. २७ ऑगस्ट सकाळी ९:०७ पासून २८ ऑगस्ट सकाळी ९:४७ पर्यंत.

**राखी बांधण्याचा शुभ काळ :** २८ ऑगस्ट सकाळी ६:१८ ते ९:४७.

तसे पाहायला गेले तर रक्षाबंधनाच्या दिवशी संपूर्ण दिवस कधीही राखी बांधता येते. मुहूर्त स्थानिक सूर्योदय आणि पंचांगानुसार काही मिनिटांनी बदलू शकतो. त्यामुळे आपल्या शहराचे पंचांग पाहणे उत्तम.

### बाप्पाची पूजा केल्यानंतर आपल्या भावाला राखी बांधावी

धार्मिक मान्यतेनुसार रक्षाबंधनच्या दिवशी सर्वप्रथम गणपती बाप्पांची पूजा करून आणि त्यांना राखी अर्पण केल्यानंतर आपल्या भावाला राखी बांधली जाते. सर्वप्रथम भावाच्या कपाळावर टिळा लावला जातो. तांदळाच्या दाण्यांनी आरती केली जाते आणि नंतर त्याच्या मनगटावर राखी बांधली जाते. राखी बांधल्यानंतर भावाला मिठाई खाऊ घातली जाते. भाऊ आपल्या बहिणींना भेटवस्तू देऊन संरक्षण, सुख आणि समृद्धीसाठी शुभेच्छाही देतात.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**